**<u>निशाणी क्रमांक 9 पुढे/</u>**

**अर्जदारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा उर्वरीत सरतपास शपथेवर पुढे सुरू :—**

**<u>अर्जदारतर्फे विधिज्ञ श्रीमती. जे.एस.खाडे</u>**

१. सदर कामी मी दि. २२.०६.२०२६ रोजी कागदयादीने हक्काचे पत्रक ज्यामध्ये आप्पा राघू महार (गायकवाड) हे पुणे येथे मयत झाले त्यांस वारस मुले दोन गेणु व निवृत्ती आहेत. हे दाखविणारे हक्काचे पत्रक दाखल केले आहे. त्यास निशाणी क्र. १२ देण्यात येते.

२. सदरकामी मी दि. २५.०३.२०२६ रोजीच्या दैनिक प्रभात या वर्तमानपत्रात दि. ०८ मार्च २०२६ रोजी दिलेली जाहीर नोटीस ची प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. १३ देण्यात येते.

३. सदरकामी निशाणी क्र. ८ येथील सायटेशन रिपोर्ट दाखल केला आहे.

४. सदरकामी मी दि. २१.०९.२०२६ रोजी हिराबाई गेणु गायकवाड यांचे मृत्यूप्रमाणपत्र, शोभा नागेश गायकवाड यांचे मृत्यूप्रमाणपत्र, निवृत्ती आप्पाजी गायकवाड यांचे मृत्यूप्रमााणपत्र, नागेश गेनबा गायकवाड यांचे मृत्यूप्रमाणपत्र, गेणबा आप्पाजी गायकवाड यांचे मृत्यप्रमाणपत्र, मंगेश नागेश गायकवाड यांचे मृत्यूप्रमाणपत्र दाखल केली आहेत. त्यास अनुक्रमे निशाणी क्र. १४ ते १९ देण्यात येते.

५. निवृत्ती आप्पाजी गायकवाड यांचे वडील आप्पा राघू गायकवाड व आई सिताबाई आप्पा गायकवाड हे खूप वर्षापूर्वी मयत झाले आहेत. त्यामुळे त्यांचा मृत्यूचा दाखला उपलब्ध नाही.

**सरतपास पूर्ण**

**सामनेवाला निरंक त्यामुळे उलटतपास नाही.**

माझे समक्ष श्रवणोत्तर स्विकृत

RAVINDRA ANANDRAO SAWANT

Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2026.07.02 17:44:36 +0530

( र.आ.सावंत )

दिनांक ०२/०७/२०२६

प्रथमवर्ग न्यायंदडाधिकारी,
सासवड.